# क्विक हील फाउंडेशनचे लातुरात सायबर सुरक्षा जनजागृती शिबीर

## * ज्ञानप्रकाशच्या शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग
## * डिजिटल तंत्रज्ञान हाताळण्याबाबत प्रशिक्षण




लातूर/प्रतिनिधी - लातूर येथील ज्ञानप्रकाश बालविकास केंद्रात क्विक हील फाउंडेशनच्या अधिकृत उपक्रमांतर्गत 'सायबर शिक्षण सायबर सुरक्षा' जनजागृती सत्र मंगळवारी उत्साहात संपन्न झाले.

क्विक हील फाउंडेशन यांच्या अधिकृत उपक्रमांतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थी साहिल जाधव आणि परमेश्वर पांढरे यांनी ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र येथे इयत्ता ५ वी ते ७ वी मधील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी सायबर शिक्षण सायबर सुरक्षा या विषयावर प्रभावी जनजागृती सत्र आयोजित केले.

या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना आजच्या डिजिटल युगातील वाढत्या सायबर धोक्यांविषयी सोप्या व समजण्यासारख्या भाषेत मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः ऑनलाइन गेमिंग स्कॅम, जढझ फसवणूक, बनावट लिंक (ऋग्ज्ञश डळपज्ञ) स्कॅम, फिशिंग, सोशल मीडिया फसवणूक, डिजिटल पेमेंट सुरक्षितता, मजबूत पासवर्डचे महत्त्व तसेच सुरक्षित इंटरनेट वापराचे नियम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याविषयीही प्रात्यक्षिक उदाहरणांसह मार्गदर्शन करण्यात आले.

सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमानंतर आयोजित करण्यात आलेल्या शंका-निरसन सत्रात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रश्न विचारले. ऑनलाइन फसवणूक कशी ओळखावी, संशयास्पद लिंकवर क्लिक केल्यास काय करावे, ओटीपी कोणालाही का सांगू नये, सुरक्षित पासवर्ड कसा तयार करावा अशा अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात आली. विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद आणि शिकण्याची उत्सुकता पाहून संपूर्ण उपक्रम अधिक प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानप्रकाश बालविकास केंद्रचे माननीय मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे आणि सहकार्यामुळे हे जनजागृती सत्र अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले.डिजिटल युगात प्रत्येक विद्यार्थी सायबर सुरक्षेबाबत जागरूक होणे ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने क्विक हील फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित डिजिटल सवयी विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. भविष्यातही अशाच प्रकारचे सायबर जागरूकता उपक्रम विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.